# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

७ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४ (थेट)
फॅक्स : २२०२२३४८
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
नवी मुंबई. (आवक शाखा)
शाखा/विभाग.
आवक/क्रमांक. २०२४२
दिनांक..... २२/११/१०

क्र.मजीप्रा/२०१०/सभा-११८/(६४)/आ.४ दिनांक : २०.११.२०१०

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव (२), नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

**विषय : दि. २९.९.२०१०रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११८ व्या सभेचे इतिवृत्त.**

महोदय,

श्री. गावडे

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बुधवार दिनांक २९.९.२०१० रोजी झालेल्या ११८ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यांत येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

आपली विश्वासू,

(उषा प्र. महाजन)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत : ११८ व्या सभेचे इतिवृत्त.



( महाराष्ट्र शासन उपक्रम )
पाणी हे जीवन आहे ! पाण्याची बचत करा !

१. वि.स.व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र.३ व ६ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. अधीक्षक अभियंता, मुख्यालय, म.जी.प्रा., मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र. ८, ९ व आयत्यावेळची कार्यक्रमबाब क्र. १, २ व ३ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

३. उप मुख्य लेखा अधि. (१) व (२) म.जी.प्रा., नवी मुंबई.

४. आस्थापना अधिकारी (द.), म.जी.प्रा., मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र. ४, ७ व आयत्यावेळी चर्चा क्र.१ व २ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

५. प्रशासकीय नि आस्था.अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र. ५ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

६. कायदा व कामगार अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

(आज)

७. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कार्यासन अधि./कक्ष अधिकारी यांच्या माहितीसाठी.

सौ.ढापरे/md.Estt.४ (Kasture)

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११८ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ११८ वी सभा मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. लक्ष्मणराव ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि.२९/९/२०१० रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.ना.श्री.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.श्री.भास्कर जाधव, राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग.
४. प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि.म.म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग.
५. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.कांतीलाल उमाप, उप सचिव, उर्जा.
६. सचिव, ग्रामविकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.वॉल्टर डिमेलो, कक्ष अधिकारी.
७. श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस मजीप्राचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

१. श्री.राजेंद्र होलानी, मुख्य अभियंता, मजीप्रा, औरंगाबाद
२. श्री.व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, मजीप्रा, पुणे
३. श्री.एन.एस.केरकर, मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक
४. श्री.व्ही.एन. राठोड, मुख्य अभियंता, म.जी.प्रा, नागपूर.
५. श्री.प्र.वा.पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
६. श्री.दु.र. चंद्रिकापूरे, मुख्य प्रशासकीय अधिकारी मजीप्रा, मुंबई
७. श्री.बी.के.सवाई, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.
८. श्री. बा.शि. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
९. श्री.सु.रा. भोसले, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
१०. श्री.सुभाष भुजबळ, प्रभारी अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, पनवेल

मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

कार्यक्रम बाब क्र.१ :

विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११७ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

दि.१३.५.२०१० रोजी संपन्न झालेल्या ११७ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

कार्यक्रम बाब क्र.२ :

विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११७ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि. १३.५.२०१० रोजी संपन्न झालेल्या ११७ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

कार्यक्रम बाब क्र.३ :

विषय : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत..

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्दयांबाबत मा. सदस्य सचिव यांनी बैठकीमध्ये उहापोह केला. या संदर्भात सविस्तर चर्चा होऊन दि.११.५.२०१० ते दि.२१.९.२०१० या कालावधीमध्ये अल्प मुदतीसाठी केलेल्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली.

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने चर्चा करीत असताना, केंद्र शासन तसेच राज्य शासनाकडून, योजनांसाठी प्राप्त होणारे अनुदान बँकांमध्ये व्याजाने अल्प मुदतीद्वारे गुंतवणूक म्हणून ठेवण्यात येते. यावर जे व्याज प्राप्त होते, त्यामधून मजीप्राच्या कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात येत असल्याचे मा.अध्यक्ष, मजीप्रा यांनी नमूद केले. तथापि, सदरचे व्याज किती प्राप्त झाले व त्याचा विनियोग कसा करण्यात आला याबाबतचा आढावा शासनास सादर केला जात नसल्याचे स्पष्ट करुन, यापुढे तसा अहवाल शासनास सादर करण्याचे तसेच शासनाच्या परवानगीने त्या व्याजाच्या रक्कमेचा वापर करण्याचे निर्देश दिले.

कार्यक्रम बाब क्र.४ :

विषय : सन २००७-०८ चा वार्षिक अहवाल.

सदर कार्यक्रम बाबीतील मुद्याबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर कार्यक्रम बाबीबाबत चर्चा होऊन, मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
प्रा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

कार्यक्रम बाब क्र.५ :

विषय : राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यांची प्रसुती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढवून, लागू केलेली सुधारित तरतूद मजीप्राच्या महिला कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत.

राज्य शासनाने राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यांची प्रसुती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविण्याची सुधारित तरतूद केली असून, सदर तरतूद मजीप्राच्या महिला कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यक्रम बाबीव्दारे संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे, मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील ध्येय धोरणे ही शासनाच्या धोरणानुसार अवलंबिली जात असल्याने, सदर प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नसल्याचे स्पष्ट करुन, कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात आली व यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

कार्यक्रम बाब क्र.६ :

विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निवृत्त वेतनधारकांना दि.१ सप्टेंबर, २००९ पासून सेवानिवृत्ती उपदान व मृत्यू उपदान रु. ५ लाखांवरुन रु.७ लाखांपर्यंत वाढविणेबाबत.

राज्य शासनाने राज्य शासकीय निवृत्ती वेतनधारकांना दि.१ सप्टेंबर, २००९ पासून सेवानिवृत्ती उपदान व मृत्यू उपदान रु. ५ लाखांवरुन रु.७ लाखांपर्यंत वाढविणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून, मजीप्राच्या निवृत्त वेतनधारकांनाही हा निर्णय लागू करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यक्रम बाबीव्दारे संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे, मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील ध्येय धोरणे ही शासनाच्या धोरणानुसार अवलंबिली जात असल्याने, सदर प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नसल्याचे स्पष्ट करुन, कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात आली व यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

कार्यक्रम बाब क्र.७ :

विषय : मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचे कार्यालयीन वापरासाठी नवीन वाहन खरेदी करण्याबाबत.

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष मजीप्रा यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले एम.एच.-०४-ए.एन.-९१९१ या क्रमांकाचे होंडा सिटी हे वाहन दि.१६ सप्टेंबर, २०१० रोजी अपघात होऊन, या वाहनाचे पूर्ण नुकसान झाले असल्याचे संचालक मंडळास अवगत करुन, नवीन वाहन खरेदी

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

करणे प्रस्तावित असल्याचे स्पष्ट करण्यात आले. यासाठी पजेरो / फॉरच्युनर / एंडएवर यापैकी एका कंपनीचे वाहन खरेदी करण्यासाठी अंदाजे रु.२० ते २२ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सबब, सदरहू वाहन खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती, मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास केली.

तथापि, शासन धोरणानुसार वाहन खरेदी करण्यासाठी रु.९ लक्ष इतकी कमाल मर्यादा असल्याचे, उप सचिव, वित्त विभाग यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर चर्चा करण्यात येऊन, अपघातग्रस्त वाहन दुरुस्त करुन, स्थानिक वापरासाठी वापरण्यात यावे त्याचप्रमाणे नवीन वाहन खरेदी करण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी असे निर्देश मा.अध्यक्ष, मजीप्रा यांनी दिले व यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले. इनोवा कार घेणे सोडून ठेवले.

कार्यक्रम बाब क्र.८ :

विषय : कुडवा व कटंगीकला गावासाठी एकत्रित (पेरी अर्बन) पाणी पुरवठा योजना ता.जि. गोंदिया ही योजना प्राधिकरणाची योजना म्हणून राबविणे, लोकवर्गणीची रक्कम मजीप्रामार्फत उभारणे व आकृतीबंधास मान्यता देणे.

विषयांकित योजनेचा रु.१०.१६ कोटी किंमतीचा प्रस्ताव, तांत्रिक मान्यतेनंतर शासनाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून, शासनाने, सदरची योजना मजीप्राच्या मालकीची योजना म्हणून हाती घ्यावयाची असल्याने, या योजनेची लोकवर्गणी मजीप्राने भरावयाची आहे. त्यासाठी मजीप्राच्या संचालक मंडळाचा काय निर्णय झाला आहे याबाबत शासनास अवगत करण्याचे निर्देश प्राप्त असून, त्यानुषंगाने या योजनेसाठीची आवश्यक रु.१०१.५४ लक्ष इतकी लोकवर्गणी मजीप्राने उभारण्यास व वित्तीय आकृतीबंधास मान्यता प्रदान करण्यासाठी कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे, सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा करीत असताना, मजीप्राच्या नाजुक आर्थिक स्थितीचा विचार करता, सदरची रु.१०१.५४ लक्ष लोकवर्गणी उपलब्ध करणे अशक्य असल्याचे निदर्शनास आले. यास्तव अंतिमत: सदरची लोकवर्गणी सर्व ग्राहकांकडून डिपॉझिट म्हणून ठराविक रक्कम उपलब्ध करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात आली.

या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी तसेच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

कार्यक्रम बाब क्र.९

विषय : UIDSSMT कार्यक्रमांतर्गत मंजूर गोंदिया वाढीव पा.पु. योजना योजनेचे काम पूर्णठेव तत्वावर हाती घेण्याबाबत व योजनेची १०% लोकवर्गणी मजीप्राने भरण्याबाबत.

केंद्र शासन पुरस्कृत विषयांकित योजनेच्या संदर्भात दि.१९.५.२००९ रोजी मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत, सदरची योजना मजीप्राची योजना म्हणून पूर्ण ठेव तत्वावर कार्यान्वित करावी व ३० वर्षे राबवावी असे निर्देश मा.मंत्री महोदयांनी दिले होते. सदर निर्देशाच्या अनुषंगाने, सदरची योजना मजीप्राची योजना म्हणून हाती घेण्यात येऊन तसा करारनामाही नगरपरिषदेसोबत दि.१७.९.२००९ रोजी करण्यात आला आहे. यानुषंगाने योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत.

सदर योजना मजीप्राची योजना म्हणून राबवावयाची असल्याने, या योजनेची लोकवर्गणी मजीप्राने भरावयाची आहे. त्यामुळे मजीप्राची योजना म्हणून कामे हाती घेण्यास व लोकवर्गणी भरण्यास मजीप्राच्या संचालक मंडळाची मान्यता घेण्यासाठीची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे, सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा करीत असताना, मजीप्राच्या नाजुक आर्थिक स्थितीचा विचार करता, आवश्यक लोकवर्गणी उपलब्ध करणे अशक्य असल्याचे निदर्शनास आले. तथापि, सदरची योजना मजीप्राची योजना म्हणून राबवावयाचा निर्णय यापूर्वीच झाला असल्याने, लोकवर्गणी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

सदर योजनेची मुळ किंमत व मंजूर किंमत यामधील फरकाची रक्कम उपलब्ध करण्याविषयी चर्चा झाली असता, सदरचा निधी नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करणे आवश्यक राहील असे मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी स्पष्ट केले. यानुषंगाने सादर केलेल्या कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात आली.

या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी तसेच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले.

आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१

विषय : तिलारी प्रकल्पावर आधारीत पाणी पुरवठा योजना,ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग प्राधिकरणामार्फत कमीत कमी निधी उपलब्ध करुन देऊन, सदरची योजना प्राधिकरणाची योजना म्हणून राबविणेबाबत....

(सही) (सही)

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदर कार्यक्रम बाबीबाबत अधीक्षक अभियंता, मजीप्रा मंडळ, पनवेल यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सिंधुदूर्ग जिल्हयातील दोडामार्ग, सावंतवाडी व वेंगुर्ले तालुक्याअंतर्गत १७ गांवे १ शहर तसेच पर्यटन क्षेत्र व इस्पात उद्योगसमुहा करीता पाण्याची मागणी विचारात घेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ११२.५१५ द.ल.लि. प्रतिदिन मागणी (अंतिम टप्पा) इतका पाणी पुरवठा करण्याची तिलारी पाटबंधारे उद्भवावर आधारित योजना सल्लागारामार्फत प्राकलनावर आधारित तयार करुन शासनास मान्यतेस्तव सादर केली आहे. सदर योजनेची अंदाजित किंमत रुपये १८४.६० कोटी निव्वळ व रुपये २१६.९०५ कोटी ढोबळ (१७.५% ई.टी.पी.सह) आहे.

सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व उत्तम स्टिल कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने "संयुक्त प्रकल्प" (Joint Project) म्हणून उत्तम स्टिल तसेच इतर लाभधारक संस्थांच्या वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणार आहे. तसेच ही योजना पूर्ण झाल्यानंतर भविष्यात या योजनेची दैनंदिन देखभाल दुरुस्तीही प्राधिकरणामार्फत करावयाची आहे. यासाठी संचालक मंडळाचा निर्णय घेऊन, शासनास कळविण्याचे निर्देश प्राप्त आहेत.

सदर योजनेबाबत मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनीही संचालक मंडळास अवगत केले. सादर केलेल्या कार्यक्रम बाबीत, प्राधिकरणामार्फत भाग भांडवल गुंतवावे अशा प्रकारची मागणी समोर आल्यास, या योजनेसाठी मिळणाऱ्या एकूण शासकीय अनुदानाच्या ५% इतकी रक्कम प्राधिकरणामार्फत भाग भांडवल म्हणून कर्ज रुपाने उभी करण्यासाठी शासनाची हमी घेण्यास किंवा सवलतीच्या दरात शासकीय कर्ज (Soft Loan) म्हणून उभारण्यास मान्यता घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, सदरची भांडवली गुंतवणूक करण्याची आवश्यकता नसल्याने, सदर बाबीची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. यावर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

१. मे.उत्तम स्टिल कंपनी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरम्यान संयुक्त करार (Joint Agreement) करुन इतर ग्राहकांच्या वतीने प्राधिकरणामार्फत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.
२. सदरच्या योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर या योजनेची पुढील ३० वर्षे दैनंदिन देखभाल दुरुस्ती प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या योजनेतील ग्राहकांना पाणी पट्टीचे दर आकारताना प्राधिकरणामार्फत भागभांडवलापोटी गुंतवणूक करण्यात आलेली रक्कम, दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरीता येणारा खर्च अधिक प्राधिकरणाच्या इतर खर्चापोटीची १०% वाढीव रक्कम गृहीत धरुन पाणी पट्टीचे दर आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.
३. तसेच या योजनेस वरील बाबींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी तसेच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२ :

विषय : सुजल निर्मल अभियान कार्यक्रमांतर्गत मंजूर कारंजा पाणी पुरवठा योजना योजना मजीप्राची योजना म्हणून राबविणे व लोकवर्गणीची रक्कम मजीप्रामार्फत उभारणे बाबत

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

अस्तित्वातील कारंजा पाणी पुरवठा केंद्र मजीप्राच्या मालकीचे असून, राज्य शासनाच्या सुजल निर्मल कार्यक्रमांतर्गत मंजूर रु.६,७१,०७,१००/- किंमतीची योजना सुध्दा नगरपालिकेने कळविल्यानुसार, मजीप्राची योजना म्हणून देखभाल दुरुस्तीसह राबवावी व लोकवर्गणीची रक्कम रु.६७.१० लक्ष मजीप्राने उपलब्ध करावी असा ठराव करुन, मजीप्रास कळविले आहे. यानुषंगाने योजनेची कामे हाती घेण्यात आली असून, कामे प्रगतीपथावर आहेत. यानुषंगाने मजीप्राची योजना म्हणून हाती घेण्यास व लोकवर्गणी मजीप्राने उपलब्ध करण्यास, संचालक मंडळाची मान्यता प्रदान करण्यासाठी कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे, संचालक मंडळास अवगत केले.

सदर कार्यक्रम बाबीबाबत चर्चा करीत असताना, लोकवर्गणीची रक्कम ही ग्राहकांकडूनच उपलब्ध होणे आवश्यक ठरते, त्यातच मजीप्राची आर्थिक स्थिती नाजुक असल्याने, सदरची लोकवर्गणी मजीप्राने उपलब्ध करणे योग्य ठरणार नाही असे मा.उपाध्यक्ष, मजीप्रा यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे मा.प्रधान सचिव यांनी असे स्पष्ट केले की, लोकवर्गणी मजीप्राने उपलब्ध करण्याचा प्रघात पडल्यास, अशा बऱ्याच योजना मजीप्राने राबवाव्यात असे प्रस्ताव येतील, जे अशक्य होऊन जाईल. अंतिमत: यावर चर्चा होऊन सदर कार्यक्रम बाबीचा प्रस्ताव स्थगित ठेवण्याचे निर्देश देण्यात येऊन, यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.३

विषय : सापन प्रकल्पावरुन प्रस्तावित २२४ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता. अचलपूर व चांदूरबाजार, जि. अमरावती योजना पूर्ण करुन मजीप्राची योजना म्हणून राबविणे व ग्राहकापर्यंतच्या पाणीपट्टी वसुलीसह देखभाल व दुरुस्ती करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, मजीप्रा, नागपूर यांनी संचालक मंडळास अवगत केले.

दि.३.८.२०१० रोजी मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत, सापन प्रकल्पावरुन २२४ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना तया

| | |
|---|---|
| मा.अध्यक्ष तथा मंत्री,<br>पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

करण्याचे व मजीप्राची योजना म्हणून लोकवर्गणी उपलब्ध करुन, देखभाल दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले होते. सदर बैठकीत यासाठीची लोकवर्गणी मजीप्रा कोणत्या शिर्षाखाली उपलब्ध करुन देईल वा ती उपलब्ध करुन देऊ शकेल किंवा कसे याबाबतचा संचालक मंडळाचा निर्णय शासनास कळवून, प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले होते.

यानुषंगाने सापन प्रकल्पावरुन अंदाजित रु.२२५ कोटी किंमतीची प्रस्तावित २२४ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले. दि.३.८.२०१० च्या बैठकीत ठरल्यानुसार, मजीप्राची योजना म्हणून हाती घेणे व लोकवर्गणीची रक्कम नळधारकाकडून प्रतिजोडणी रु.५००/- प्रमाणे वसूल करुन, भरण्याबाबतचा सदरचा प्रस्ताव असून, कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात येत असलेल्या या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याची विनंती मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास केली.

सदर योजना संपूर्णपणे गुरुत्वावर आधारीत असल्यामूळे विजेचा वापर न करता धरणापासून थेट नळग्राहकापर्यंत पाणी पुरवठा करणे प्रस्तावित आहे. सदर योजना कार्यान्वित झाल्यानंतर दरवर्षी जवळपास ९०,५२,००० विज युनिटची व रु.४.५३ कोटीची बचत होणार आहे.

यानुषंगाने बैठकीत चर्चा होऊन, लोकवर्गणी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात प्रस्तावित केलेल्या रु.५००/- प्रति नळजोडणीऐवजी रु.१०००/- वा आवश्यक लोकवर्गणी उपलब्ध होण्याइतपत ठराविक रक्कम ग्राहकांकडून उपलब्ध झाल्याशिवाय योजनेचे काम हाती घेण्यात येणार नाही या अटीच्या अधीन राहून, सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली.

यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

आयत्या वेळेची चर्चा क्र.१ :

विषय : अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या आवश्यक असलेल्या ठिकाणी करण्याबाबत.

मा.उपाध्यक्ष, मजीप्रा यांनी सदर बैठकीत, कोकण प्रदेशामध्ये मजीप्रास कामे नसल्याने, बरेच अधिकारी/कर्मचारी कामाविना बसून असल्याचे निदर्शनास आणून, त्यांना कामे उपलब्ध करुन द्यावीत अथवा आवश्यक असलेल्या इतर ठिकाणी त्यांच्या बदल्या करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

याबाबत मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे स्पष्ट केले की, ही वस्तु:स्थिती असून, ज्या ठिकाणी कामे आहेत, त्या ठिकाणी आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग अपुरा आहे. यानुषंगाने आढाव्याअंती राज्यांतर्गत अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. तथापि, लोकप्रतिनिधींच्या दबावामुळे, केलेल्या बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे करता येत नसल्याचे, निदर्शनास आणून दिले.

मा अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

यावर मजीप्राच्या हिताच्यादृष्टीने घेतलेल्या चांगल्या निर्णयामध्ये कोणालाही राजकीय हस्तक्षेप करता येणार नाही, हे स्पष्ट करुन, गेल्या पाच वर्षात किती योजना मंजूर करण्यात आल्या, सदरच्या योजना पूर्ण करण्यासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी यांचा आढावा घेण्यात येऊन, यानुषंगाने योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे निर्देश देण्यात येऊन, यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यक्रम बाबीव्दारे संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले. त्याचप्रमाणे गेल्या ५ वर्षात किती योजना पूर्ण केल्या व प्रत्येक महसूल विभागात सदर कामांवर किती कर्मचारी कार्यरत होते, याबाबतचा सविस्तर आढावा घेऊन, त्याबाबतचा अहवाल कार्यक्रम बाबीव्दारे संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले.

आयत्या वेळेची चर्चा क्र.२ :

विषय : बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर मजीप्राच्या मालकीच्या जागांचा विकास करणेबाबत.

मा.अध्यक्ष, मजीप्रा यांनी, राज्यांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या बऱ्याच जागा या विनावापर वा ज्या ठिकाणी स्थावर मालमत्ता जसे, अधिकारी/कर्मचारी निवास पडून आहेत, त्या जागांचा विकास करणे अत्यंत गरजेचे असल्याचे निदर्शनास आणून दिले. सदर मोकळ्या जागांचा विकास केला नाहीतर, सदर जागांवर अतिक्रमण होण्याची शक्यताही नाकारता येणार नसल्याचे निदर्शनास आणून दिले.

यानुषंगाने ज्या जागा मोकळ्या आहेत, त्या जागांचा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकास करण्याचा तसेच जेथे अधिकारी/कर्मचारी निवासस्थाने आहेत त्या वास्तु बऱ्याच ठिकाणी मोडकळीस वा वापरण्यायोग्य नाहीत, मात्र त्या योग्यतेनुसार दुरुस्त केल्यास त्याचा वापर होणे शक्य असल्याने, तसा प्रस्ताव कार्यक्रम बाबीव्दारे संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचेही निर्देश मा.अध्यक्ष महोदयांनी दिले. त्याचप्रमाणे ज्या जागांचा विकास करणे शक्य होणार नाही, त्या जागांचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मुल्यनिर्धारण (Valuation) करुन घेऊन त्याचा लिलाव जाहीर प्रसिध्दी देऊन करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले.

बैठकीच्या अंती, स्वेच्छा निवृत्ती घेत असलेले श्री.संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मजीप्राकरीता तसेच महाराष्ट्राच्या पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रास केलेल्या सहकार्याचा व केलेल्या कार्याचा गौरव करण्यात येऊन, त्यांना उर्वरित आयुष्य सुख-समृध्दीचे जावो व सदिच्छा देऊन, त्यांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने, उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(सही)
मा.अध्यक्ष तथा मंत्री,
पा.पु. व स्व.

(सही) संजय दहासहस्त्र
सदस्य सचिव
म.जी.प्रा.